**नि.दिवाणी दावा क्रं.५९/२००९**

**नि. क्रं.१३७**

**:: वादी पक्षातर्फे सा. क्रं.०६ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो/करते की,**

**माझे नांव** : शिवाजी नारायण धनेगावे

**वय** : ५६ **काम** : ग्रामसेवक,

पंचायत समिती लातूर ता. जि. लातूर.

**:: वादी पक्षातर्फे सरतपासणी विधीज्ञ श्री. व्ही.एन. संकाये यांचेमार्फत शपथेवर सुरू ::**

दि.२६/०९/२००९ रोजी मी ग्रामपंचायत गुरधाळ येथे ग्रामसेवक म्हणून कार्यरत होतो. आता मला नि.१३३ वरील वारसाचे प्रमाणपत्र दाखविले. मी ते दिलेले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यावर ग्रामपंचायतचा शिक्का आहे. सरपंच, सदस्य, उपसरपंच, पोलीस पाटील व विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष यांना मी वारसाचे प्रमाणपत्र देता येत नाही म्हणून सांगितले होते. परंतु त्यांनी प्रमाणपत्र देण्यास भाग पाडले. त्या काळात ग्रामसेवक वारसाचे प्रमाणपत्र देत होते.

सरतपास पूर्ण.

**:: प्रतिवादी क्र.१ ते ३ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. डी.टी. पाटील यांच्यामार्फत ::**

०२. एखाद्या व्यक्तीला प्रमाणपत्र दिल्यास त्याची नोंद ग्रामपंचायतमध्ये ठेवली जाते. पांडुरंग नागोबा वलसे यांच्या संदर्भात ग्रामपंचायत अभिलेखामध्ये नोंद नव्हती. मयताचे कोण कोण वारस असतात हे मला माहीत नाहीत. पांडुरंगच्या पत्नीबाबत मी चौकशी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला अधिकार नसताना मी प्रमाणपत्र दिले. हे म्हणणे खरे नाही की, मी बनावट वारस प्रमाणपत्र दिले. मला साक्षीसमन्स

मिळालेला आहे. त्यामध्ये साक्ष कशाबाबत द्यायची हे नमूद नव्हते. मी अभिलेख बघितल्यानंतर मला साक्ष कशाबाबत द्यायची हे कळाले. मला वारस प्रमाणपत्र साक्षीपूर्वी कोणीही दाखविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

:: **प्रतिवादी क्र.४ ते १२ आणि त्यांचे अधिवक्ता गैरहजर आहेत. त्यांनी प्रकरण चालविण्यास आणि उलटतपास घेण्यास कसूर केला. सबब उलटतपास नाही.** ::

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत　　　　　　सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )　　　　　　( श.अ. सुरजुसे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.　दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.
दि.०५/०३/२०२६.